VOL- VIII ISSUE- V MAY 2021 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.149 ISSN 2349-638x

# ख्रिस्ती धर्म आणि भारत

**विश्वास गोरखनाथ वळवी**
( संशोधक विद्यार्थी )
कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव ( महाराष्ट्र )
ईमेल:-vishwasvalvi1986@gmail.com

भारत आणि ख्रिस्ती धर्म यांचे नाते २०२० वर्षांपूर्वीचे आहे. इ.सनाच्या पहिल्या शतकात सेंट थॉमस हा येशू ख्रिस्ताचा बारा शिष्यांपैकी एक केरळच्या किनारपट्टी मार्गे भारतात आला. त्याने केरळ मध्ये सात चर्चची स्थापना करून ख्रिस्ती धर्माची मुळे रुजवली. इ.सनपूर्व सहावे शतक हे भारतीय इतिहासात धर्मक्रांतीचे युग होते. या शतकात हिंदू धर्मातील कर्मकांड अति स्वरूपामुळे जैन आणि बौद्ध धर्माचा उदय झाला. जैन धर्म सत्य आणि अहिंसेवर भर देणारा तर बौद्ध धर्म विज्ञानवादी आणि इहवादी गोष्टींवर भर देणारा पंथ होता. जैन आणि बौद्ध धर्माबरोबरच या शतकात जवळजवळ ६२ नवीन धर्म-पंथाचा उदय झाला. त्यामुळे भारतीय समाज हा फक्त वेगवेगळ्या राजकीय सत्तेखाली वावरत नव्हता तर वेगवेगळ्या धर्मपंथाच्या छत्रछायेखाली आपले वैचारिक अधिष्ठान धरून होता. अशा परिस्थितीत ख्रिस्ती धर्म हा भारतात आला.

'मी, माझा देश, माझी मंडळी' या पुस्तकात रेव्ह.सुभाष डोंगरदिवे म्हणतात, "आपला भारत देश महान आहे. देशाच्या महानतेविषयी जाणीव करून देणारे 'मेरा भारत महान' हे तीन शब्द अनेक ठिकाणी आपणास वाचावयास मिळतात. देशाची महानता ही प्रामुख्याने त्या देशातील लोकांच्या महानतेवर अवलंबून असते. देशाच्या भौगोलिक क्षमतेमुळे देश महान किंवा लहान ठरत नाही. आपल्या भारत देशाला महानता प्राप्त करून देणारे लोक म्हणजे भारताच्या शिरावर सजवले आहे. आज देश या नात्याने आमच्यासमोर जे आव्हान आहे ते म्हणजे भारताची महानता टिकून ठेवणे. भारताची महानता भारताचे नागरिक आणि पुढारी या नात्याने आमच्या महानतेमध्ये आहे. या देशाचे ख्रिस्ती नागरिक या नात्याने या समस्या समजून घेऊन त्या सोडविण्यासाठी देशाला हातभार लावणे हे आपले ख्रिस्ती कर्तव्य आहे."[१]

एक ख्रिस्ती व्यक्ती म्हणून मी भारताचा नागरिक आहे. त्यामुळे मी फक्त भारताच्या अध्यात्मिक पोषकच नाही तर देशाच्या भौतिक प्रगती देखील पोषक ठरावे, या दिशेने माझी पाऊले मी निरंतर टाकावी. भारताचे राष्ट्रगान आणि प्रतिज्ञा जेव्हा मी वाचतो अथवा गातो. तेव्हा भारत देशाशी असलेले माझे नाते हे घट्ट होत जाते. भारतीय स्वातंत्र्य आणि राष्ट्रवादात आपली भूमिका बजावणारे अनेक लोक ख्रिस्ती समाजातून होते आणि त्यातून प्रेरणा घेऊन आम्ही भारताच्या प्रगतीत हातभार लावण्यास तयार असले पाहिजे.

भारतास स्वातंत्र्य लढ्यात अनेक ख्रिश्चन लोकांची योगदाने आहेत. त्यामध्ये श्रीमती ॲनी बेझंट, ए.एस.ह्यूम, सुरेंद्रनाथ बॅनर्जी, दीनबंधू, पंडिता

रमाबाई, जे.सी.कुमाराप्पा, जयपालसिंग दावीद मुंडा इत्यादी मंडळींनी भारत देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात आपले अमूल्य योगदान दिले आहे. भारताचे योगदान स्वातंत्र्यानंतरही किती महत्वाचे होते, हे पुढील उदाहरणावरून समजते, “भारताचे प्रथम पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी आरोग्य, शिक्षण आणि सामाजिक-आर्थिक विकासावर संपूर्ण लक्ष केंद्रित करून आधुनिक भारताची उभारणी करण्यासाठी कोडियम कार्डीयश ग्रेशियस यांना कॅथलिक चर्चला या कार्यात सहभागी होण्यासाठी आमंत्रित केले होते. कार्डीयश ग्रेशीयस यांनी भारतातील सर्व बिशपाना व धार्मिक मंडळांना द कॅथलिक हॉस्पिटल असोसिएशन ऑफ इंडिया जे या भागात चर्चची सेवा पुरवीत होते. त्याला अधिक गतिमान करण्यासाठी आमंत्रित केले. अशाप्रकारे जेम्स टॉंग यांच्या नेतृत्वाखाली कॅथलिक रिलीफ सर्विसेस, व्हालन्टरी हेल्थ असोसिएशन ऑफ इंडिया, आय एज्युकेशन कमिशन, कॅथोलिक चारीटीज इंडिया आणि करियस इंडिया या संस्थांची स्थापना करणे, हे आरोग्य, शिक्षण आणि सामाजिक-आर्थिक विकासावर लक्ष केंद्रित करण्याच्या पंतप्रधानांनी दिलेल्या हाकेला प्रतिसादाची उदाहरण होय.”[२] १९५० नंतर भारतामध्ये पहिली पंचवार्षिक योजना राबविली गेली. भारताला लघु उद्योगास स्वयंपूर्ण करणे अगत्याचे होते आणि त्यासाठी भारताचे तत्कालीन पंतप्रधान यांनी ख्रिस्ती लोकांच्या सल्ल्यांचे अनुकरण केले. कारण त्यांना माहित होते भारतात १८१३ पासून शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक सुधारणांचा पाया ख्रिस्ती मिशनऱ्यांनी रोवला. ख्रिस्त मिशनऱ्यांचे कार्य हे आधुनिक भारताच्या रोपणीत महत्त्वपूर्ण आहे. “मिशनऱ्यांनी आम्हाला ख्रिस्ताबरोबर ऐहिक सुखाचा मार्ग दाखविला. दोन हजार वर्षांपूर्वी प्रभू ख्रिस्ताने अनेक चमत्कार केले. मिशनऱ्यांनी आमच्या दारी अनेक चमत्कार केले. त्यांनी प्रतिकूल परिस्थितीत केलेले कार्य कोणत्याही चमत्कारापेक्षा कमी नव्हते. प्रभू ख्रिस्ताने लोकांना जेवण देऊन तृप्त केले, त्याचप्रमाणे मिशनऱ्यांनी अनेकांना अन्न देऊन तृप्त केले. प्रभू ख्रिस्ताने अंधांना दृष्टी दिली, त्याचप्रमाणे मिशनऱ्यांनी ज्ञान देऊन आम्हाला नवदृष्टी दिली. प्रभु ख्रिस्ताने मुक्याना वाचा दिली, त्याचप्रमाणे मिशनऱ्यांनी हजारो वर्षे वाचा बंद असलेल्या आम्हाला वाचा दिली. ख्रिस्ताने दुखणाऱ्यांना बरे केले तर मिशनऱ्यांनी औषधोपचाराने रोग्यांना बरे केले. प्रभू ख्रिस्ताने मेलेल्यांना जिवंत केले, मिशनऱ्यांनी मृत्यूपर्यंत टेकलेल्यांना जीवनदान दिले. मिशनऱ्यांचे हे कार्य आमच्यासाठी एका एका मोठ्या चमत्काराप्रमाणे होते. मिशनरींनी आम्हाला काय दिले नाही ? त्यांनी आम्हाला विश्वास, दीक्षा, प्रेम दिले, धर्म दिला, भाकर दिली, आत्मविश्वास दिला, स्वाभिमान दिला आणि सर्वात महत्वाचे म्हणजे उच्चवर्णीयांच्या गुलामगिरीतून मुक्त करुन आमच्या कोंडलेला श्वास मुक्त केला.”[३] ख्रिस्ती मिशनऱ्यांनी भारताला काय दिले नाही ? भारतीय समाज सुधारणांचे वारे योग्य दिशेने वाहायला भाग पाडणारे ख्रिस्ती मिशनरी यांचे कार्य आज भारतीय जनमानसात रुजलेले आहे. स्वातंत्र्यपूर्व काळ असो वा स्वातंत्र्यानंतरचा काळ असो. ख्रिस्ती मिशनरी यांचे कार्य भारताच्या जडणघडणीत शाश्वत राहील आणि आज तेच कार्य आधुनिक ख्रिस्ती मंडळ्या आणि संस्था करीत आहे. हे करीत असतांना अनेक हल्ले ख्रिस्ती लोकांवर होत आहे. पण त्यांनी आपले कार्य कधीच मागे घेतले नाही. उदा. ग्रॅहम स्टेन्स या ख्रिस्ती मिशनरी परिवाराला धर्मांतराच्या नावावर जाळून टाकण्यात आले. “विसाव्या शतकात रक्तसाक्षी होणाऱ्या निवडक ख्रिस्ती मिशनरीपैकी ते होते. एका परकीय देशात येऊन ख्रिस्ताची ओळख करून देऊन स्वतः सोबत आपल्या मुलांना देखील त्या सेवेसाठी

रक्तसाक्षी केले. पुढे त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून भारत सरकारने त्यांच्या पत्नी ग्लाडीन ग्रॅहम यांना पद्मश्री देऊन त्यांचा सन्मान केला. आज भारतातील अनेक मिशनरी संस्था आणि ख्रिस्ती समाजाला ग्रहम स्टेन्स आणि त्यांच्या पत्नी ग्लाडीन ग्रॅहम या दोघांची मिशनरी चळवळ सर्वोच्च सेवा आणि स्वार्थत्याग शिकवते. त्याचबरोबर भारतातील सामान्य लोकांसाठी तर परदेशी मिशनरी रक्तसाक्षी होतात."[४] भारतात अशी अनेक उदाहरणे आहेत. ख्रिस्ती मिशनऱ्याबरोबर अनेक ख्रिस्ती लोकांवर हल्ले होतात. पण त्यांनी कधीही भारत देशाशी अप्रामाणिक राहण्याचा प्रयत्न केला नाही. आपले सर्वोच्च भारत देशाला वाहण्याचे कार्य केलेले आहे. भारत देश सत्यमेव जयतेवर उभा आहे आणि त्याची कदर ख्रिस्ती लोक नेहमी करतात. "ज्या युगात आज आपण राहत आहोत. त्याला सत्योत्तर युग असे संबोधण्यात आले आहे. जेथे सत्याची परिभाषा सापेक्ष अशी केलेली आहे आणि संपूर्ण अशी नाही. त्या कारणामुळे जेव्हा आपण भूतकाळ उकलतो तेव्हा कल्पनाविलास व प्रकटीकरण, नित्य आणि सत्यता यामध्ये फरक करताना पुष्कळ काळजी घ्यावी लागते. कधी कधी सत्यसुद्धा दुःखदायक ठरते तथापि त्याचा सामना करण्यासाठी आपल्याला घाबरण्याची आवश्यकता नाही. कारण ज्याप्रमाणे दिल्लीस्थित संसद भवनावर 'सत्यमेव जयते' असे कोरून ठेवलेले आहे. त्याप्रमाणे अंतिमतः केवळ सत्याचाच विजय होईल. त्यामुळे आपल्याला भूतकाळाचे टिकात्मक मूल्यमापन आम्हाला अजून भारताला अधिक बांधण्यासाठी समचित धडा देईल. भारताची गाथा 'आम्ही भारताचे लोक' या वाक्याने सुरू होते.[५] भारत देश सत्यमेव जयतेवर उभा आहे आणि ख्रिस्ती लोकांनी आपले योगदान सत्यावर आधारित दिलेले आहे. निस्वार्थ कर्मयोगीप्रमाणे आपले ऐहिक सुख वेचून, स्वत्याग आणि स्वाभिमान बाजूला सारून स्वतःच्या इच्छा, आकांक्षा यांना मूर्त स्वरूप देऊन ख्रिस्ती मिशनरी आणि ख्रिस्ती लोकांनी आपले सर्वस्व भारत देशासाठी देऊन टाकले. ख्रिस्ती धर्म आणि भारत देशाचे नाते जेवढे प्राचीन आहे तेवढेच ते प्रामाणिक आणि विश्वासबंद आहे. त्याला अजून कोणीही तोडू शकले नाही. कारण ते नाते सत्यमेव जयतेवर आधारलेले आहे, संविधानावर आधारलेले आहे, धर्मनिरपेक्षतेवर आधारलेले आहे, लोकशाहीवर आधारलेले आहे. 'भारत माझा देश आहे' आणि 'आम्ही भारताचे लोक या' सर्वोच्च प्रतिज्ञेवर आधारलेले आहे.

ख्रिस्ती धर्म हा आता भारतीय धर्म झालेला आहे. आम्ही कधी पर्यंत त्याला युरोपियन धर्म मानत राहू. ख्रिस्ती धर्माला संविधान धर्मनिरपेक्ष कलमाखाली सर्व अधिकार बहाल करतो. भलेही त्याचे स्वरूप अल्पसंख्यांक असो. पण भारताच्या प्रत्येक जाती, धर्म, वंश आणि प्रदेश यात ख्रिस्ती धर्म रुजलेला आहे. भारतीय ख्रिस्ती संत साधू सुंदर सिंग सांगतात, "मी माझ्या ख्रिस्ती मंडळीला नेहमी सांगत असतो, आपण पाश्चिमात्य कपातून भारताला धर्म देऊ करतो. म्हणून भारत तो नाकारीत आहे. पण तेच स्वदेशी भांड्यातून किंवा स्वदेशी पद्धतीने आपण त्यांना तो देऊ लागलो तर तो धर्म आपल्या लोकांना कळेल व ते आनंदाने त्याचा स्वीकार करतील."[६] भारतीय मिशनरी जेवढे तयार होतील, भारतीय मिशनरी चळवळ तेवढ्या मोठ्या प्रमाणात फोफावेल. भारतीय संस्कृती आणि परंपरा नाकारून चालणार नाही. साधू सुंदर सिंग यांच्या मित्राने त्यांना एकदा सांगितले, "तुला तुझ्या भगव्या झग्याचे किती महत्त्व आहे. हे मी जाणून आहे. तू भारताला पाश्चिमात्य पेल्यातून जीवनाचे पाणी देत आहेस. पण भारतीय ख्रिस्ती मंडळीलाही ती पद्धत तु शिकविली पाहिजेत.

ख्रिस्ताचा अनुभव तुला आला आहे व तो हिंदू मुसलमान यांना देखील यावा तुला वाटले पाहिजे."७ साधू सुंदर सिंग यांच्या मित्राचे शब्द आजच्या मंडळीला देखील लागू होतात. "आजच्या मराठी ख्रिस्ती मंडळ्या खऱ्या अर्थाने भारतीय भूमीत रुजल्या आहेत का ? त्या खऱ्या अर्थाने भारतीय ख्रिस्ती मंडळ्या म्हणून ओळखल्या जातात का ? ख्रिस्ती मंडळांकडे पाहण्याचे इतरांचे दृष्टीकोन अनेक प्रकारचे आहेत. ख्रिस्ती समाज राष्ट्रनिष्ठ नाही, कारण ख्रिस्ती धर्म पाश्चात्यांचा धर्म आहे, अशा प्रकारचे गैरसमज अनेकांच्या मनात वर्षानुवर्षे घर करून बसले आहेत. ख्रिस्ती लोकांवर 'पाश्चात्यांचे हस्तक', 'परकीयांचा धर्म स्वीकारलेले' अशी लादली गेलेली दूषणे दूर करून आम्ही स्वतंत्र, स्वदेशी व नैसर्गिक बनले पाहिजे. आतापर्यन्त वापरात असलेल्या पाश्चात्य मिशनरी व पाश्चात्त्य मंडळयांच्या आधाराच्या कुबड्या दूर सारून जे भारतीय भूमीला मानवेल, लागू पडेल, जवळ वाटेल, ते स्वीकारून त्याद्वारे आवेशपूर्ण सुवार्ता प्रसार केला पाहिजे."८ खरे पाहता आज आधुनिक काळात भारतीय मंडळ्या या पूर्णतः भारतीय झाल्या आहेत. ब्रदर डॅनियल, साधू सुंदर सिंग, भक्तसिंग इत्यादी भारतीय ख्रिस्ती प्रेषितामुळे भारतात १९३० नंतर भारतीय ख्रिस्ती मंडळीचा एक नवीन प्रवाह सुरू झाला आणि स्थानिक मंडळ्या या खेडेगावात उदयास येऊ लागल्या. त्यामुळे खेडेगावात ख्रिस्ती मंडळींत अनेक सुधारणा घडवून आणण्याचे कार्य केले आणि हे सर्व कार्य धर्मांतरित ख्रिस्ती लोकांनी केले. त्यामुळे सद्यस्थितीला ख्रिस्ती धर्म संपूर्ण भारतात स्थानिक मंडळ्या आणि गृहमंडळाद्वारे कार्यरत आहे आणि त्यात पाळक, उपदेशक, बिशप, रेव्ह, संस्थाचालक ही सर्व पदे भारतीय ख्रिस्ती लोकांची आहेत. ख्रिस्ती मिशनऱ्यांनी १९७० नंतर मिशनरी कार्याची धुरा धर्मांतरित ख्रिस्ती लोकांकडे सोपविले आणि तेव्हापासून युरोपियन ख्रिस्ती धर्म हा पूर्ण भारतीय ख्रिस्ती धर्म झालेला आहे, यात दुमत नाही.

ख्रिस्ती धर्मातील शास्त्रशाळा आणि मंडळ या देशहित आणि देशाच्या जडणघडणीत प्रामाणिक असे सेवक निर्माण करत आहे. भारतात ख्रिस्ती धर्मात स्त्री-पुरुष प्रमाण भारतीय स्त्री-पुरुष प्रमाणाच्या तुलनेत सर्वात जास्त आहे. लोकसंख्या भलेही २.३ टक्के आहे. पण या लोकसंख्येने भारतात विशेषतः मिझोराम, नागालँड, गोवा, महाराष्ट्र या राज्याबरोबरच दुर्गम भागातील प्रदेशात आपले अमूल्य योगदान दिलेले आहे.

भारतीय ख्रिस्ती म्हणून समाजात वाटते की, मी एक भारतीय ख्रिस्ती आहे. अथवा मराठी ख्रिस्ती समाजातील एक घटक आहे. धर्मांतरित झालेल्या ब्राह्मणांमध्ये नारायण वामन टिळक यांना मी भारतीय ख्रिस्ती आहे. याचा सर्वात जास्त अभिमान होता. "नारायण वामन टिळक या ब्राह्मण धर्मांतरिताने ज्या पाश्चात्त्य धर्माचे भारतीयीकरण करण्याच्या हेतूने या दिशेने पहिला प्रयत्न केला. १९२७ मध्ये ख्रिस्ती स्वाराज्याची (स्वराज्य नव्हे) संकल्पना मांडली. स्वराज्य म्हणजे स्वर्गाचे राज्य (स्वतःचे राज्य नव्हे) देवाचे राज्य याच संकल्पनेतून 'ख्रिस्ताचा दरबार' ही संकल्पना पुढे आली. ख्रिस्ताचा हा दरबार बाप्तिस्मा झालेल्या आणि न झालेल्या ख्रिस्तशिष्यांचा समुदाय होय. या दरबाराच्या माध्यमातून भक्तांनी आराधनेच्या द्वारे आपले जीवन त्याला (ख्रिस्ताला) समर्पित करायचे असते. टिळकांचा या संकल्पनेला पुष्कळ अंशी प्रतिसाद दिला होता. ही भक्तीची एक भारतीय तर्हा होती."९

ना.वा. टिळकांनी भारतीय संस्कृती आणि परंपरा यांचा त्याग केला नाही. त्यांनी 'धर्मांतरण म्हणजे देशांतर नव्हे' हा लेख लिहून हृदयपरिवर्तन

आणि ख्रिस्ती जीवनशैली यांचा पुरस्कार केला. तसेच ख्रिस्तायन हा ग्रंथ भारतीय पुराणावर आधारित लिहिला. जेणेकरून ख्रिस्ताचा प्रचार भारतीय पद्धतीने करता यावा.

एकंदरीत ख्रिस्ती धर्म हा आता पूर्णतः भारतीय ख्रिस्ती धर्म झालेला आहे. त्याला पाश्चात्त्यांचा धर्म अथवा युरोपियन धर्म म्हणून संबोधणे आता बंद करायला हवे.

**संदर्भसूची :-**

1) पूर्वोक्त मी, माझा देश आणि माझी मंडळी, रेव्ह.सुभाष डोंगरदिवे,पृ.क्र. १३८.
2) पूर्वोक्त, भारत घडो, बाबू के. वर्गीस, पृ.क्र. १७-१८.
3) पूर्वोक्त, गावकुसाबाहेरील ख्रिस्ती समाज, कामिल पारखे, पृ.क्र. २४.
4) मिशनरीच्या पाउलखुणा, विश्वास वळवी, शब्दस्नेह प्रकाशन, प्रथमावृत्ती, पुणे, १९ डिसेंबर २०१९, पृ.क्र. ५९-६०.
5) पूर्वोक्त, भारत घडो, बाबू के. वर्गीस, पृ.क्र. १८.
6) पूर्वोक्त, मिशनरीच्या पाउलखुणा, विश्वास वळवी, पृ.क्र. ५७..
7) पूर्वोक्त, मिशनरीच्या पाउलखुणा, विश्वास वळवी, पृ.क्र. ५७-५८.
8) पूर्वोक्त, मिशनरी कार्याचे आव्हान, रेव्ह. अतुल अघमकर, पृ.क्र. १०२-१०४.
9) पूर्वोक्त ख्रिस्ती मिशन सेवाकार्य, रेव्ह. अतुल अघमकर, पृ.क्र. २४२.